ठाणे महानगरपालिका,ठाणे.
महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १२/३/२०१०

मा.स्थायी समिती सभा

सभा सुचना क्र.१, दिनांक ८/३/२०१०

सभा क्रमांक१ दिनांक १२/३/२०१०

ठाणे महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक १२/३/२०१० रोजी कै.अरविंद कृष्णाजी पेंडसे सभागृहात सभा सुचना क्र.१, दिनांक ८/३/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेतील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.मिलिंद माधव पाटणकर | सभापती |
| २. | श्री.नागसेन गंगाराम इंदिसे | सदस्य |
| ३. | श्री.दिलीप चंद्रकांत बारटक्के | सदस्य |
| ४. | श्री. राम पांडुरंग रेपाळे | सदस्य |
| ५. | श्री. संतोष वसंत वडवले | सदस्य |
| ६. | श्रीमती सुरेखा सुरेश खातु | सदस्य |
| ७. | सौ.स्मिता मधुकर देशमुख | सदस्य |
| ८. | श्री. गणेश यशवंत साळवी | सदस्य |
| ९. | श्री. भरत अभिमन्यु चव्हाण | सदस्य |
| १०. | श्री. हरीश काशिनाथ वैती | सदस्य |
| ११. | श्री.नजिब सुलेमान मुल्ला | सदस्य |
| १२. | श्री.दिनेश दाजी कांबळे | सदस्य |
| १३. | श्री.यासीन अयुब कुरेशी | सदस्य |
| १४. | श्री. शैलेश तुकाराम सावंत | सदस्य |

सदर सभेस खालीलप्रमाणे सदस्य अनुपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १५. | सौ. कविता सुरेश पाटील | सदस्य |

वंदे मातरमने सभेची सुरुवात होते.

मा. महापालिका सचिव, श्री. मकरंद काळे हे विषयपत्रिकेस सुरुवात करतात.

मा. महापालिका सचिव :

कार्मिक अधिकारी यांचा रजेचा अर्ज आलेला आहे.

श्री. राम रेपाळे :

सभापती महोदय, आजची स्थायी समितीची ही पहिलीच सभा आहे तसेच आमच्या कांही सदस्यांची ही पहीलीच सभा आहे. स्थायी समिती सभागृह हे महासभइतकेच महत्वाचे सभागृह आहे. या सभागृहात शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातून सर्वच बाबतीत निर्णय होतात. परंतु ही पहिली सभा असताना सुध्दा आपले आयुक्त महोदय तसेच उपआयुक्त , आरोग्याधिकारी बरेचसे अधिकारी आज सभागृहात उपस्थित दिसत नाहीत. म्हणजे त्यांना उपस्थित राहण्यात स्वारस्य नाही कांय, असा प्रश्न उपस्थित होतो माझ्या माहितीनुसार महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना. अशोकरावजी चव्हाण हे एस.टी. कामगारांच्या मेळाव्यासाठी आज उपस्थित राहणार आहेत. यापूर्वी आयुक्त महोदय स्थायी समितीच्या सभेला उपस्थित राहत असत, तसेच सर्व अधिकारी जातीने उपस्थित राहत. मुख्यमंत्री साहेब येणार म्हणून आयुक्त महोदय नाहीत हे आम्ही समजू शकतो परंतु इतर सर्व अधिकारी उदा. केंद्रे साहेबांना त्याठिकाणी उपस्थित राहण्याचा प्रश्न नाही. डीन मॅडम तेथे जाऊ शकतात, तसेच इतर उपआयुक्तांना सुध्दा त्याठिकाणी जाण्याची आवश्यकता नव्हती. तरी आम्हाला असे वाटते की, जाणुनबुजून अनुपस्थित राहून त्यांनी या सभागृहाचा अपमान केलेला आहे आणि आमच्या स्थायी समिती सभापतींचा सुध्दा अपमान केलेला आहे. तरी आजची सभा तहकुब करावी अशी सुचना मी मांडत आहे.

श्री. नजीब मुल्ला :

सभापती महोदय, वास्तविक पाहता स्थायी समितीमध्ये विषयपत्रिकेवरील तसेच आयत्यावेळी विषय येत असतात. स्थायी समिती ही आर्थिक निर्णय घेणारी समिती आहे. बजेटचा जास्तीत जास्त फायदा या शहराच्या कामासाठी व्हावा म्हणून आपण स्थायी समिती मध्ये चर्चेसाठी बसतो. मागील एक वर्षाच्या काळात देखिल प्रत्येक स्थायी समितीमध्ये वारंवार उपआयुक्तांमार्फत तक्रार नोंदविलेली आहे. वरीष्ठ अधिकारी ज्यांच्याकडे ३-३,४-४ खात्याचा कारभार असतानाही ते स्थायी समिती सभेला उपस्थित नसतात. कार्यकारी अभियंता किंवा उप अभियंता उपस्थित असतात परंतु त्यांच्याकडे दिलेले अधिकार

कांय आहेत ? आज त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारचे अधिकार नाहीत. त्यामुळे अंतिम निर्णय घेऊ शकत नाही. आरोग्य विभागाचे विषय आहेत परंतु आजच्या सभेला आरोग्याधिकारी उपस्थित नाहीत. नगर अभियंता आतांच उपस्थित राहीले आहेत. तरी याबाबत निर्णय घ्यायचा की, स्थायी समिती पूर्णवेळ तहकुब करायची कां ? तरी याबाबतीत माझे असे मत आहे की, जोपर्यंत केंद्रे व इतर अधिकारी आलेले नाहीत त्यामुळे पूर्णवेळ सभा तहकुब करावी. तरी फक्त याबाबत सुचना आहे की, ‘ मुख्यमंत्री आले म्हणून अधिकारी गेले व त्यामुळे स्थायी समिती तहकुब करण्यांत यावी ’, हे जे सन्मा. सदस्य श्री. राम रेपाळै यांनी मांडले तो मुद्दा वगळावा. परंतु स्थायी समितीचे गांभिर्य लक्षात घेऊन, या शहराच्या बाबतीत अनेक प्रश्न सदस्यांना मांडायचे असतात परंतु अधिकारी उपस्थित नसल्यामुळे निर्णय होत नाही म्हणून ही सभा तहकुब करावी याच विषयावर मी अनुमोदन देत आहे.

मा. सभापती :

सन्मा. सदस्य श्री. राम रेपाळे यांनी जी तहकुबीची सुचना मांडली आहे. खरे म्हणजे मुख्यमंत्री आले आयुक्त गेले हे आम्ही समजू शकतो.आता जे उपआयुक्त (मु.) बसले आहेत त्यांना कल्पनाही नव्हती की, आजच्या सभेचा कार्यभार त्यांना सांभाळायचा आहे. स्थायी समिती ही महासभेइतकीचा किंचितही कमी नाही अतिशय महत्वाची समिती आहे. अशावेळेला आजच्या सभेत अतिरीक्त आयुक्त, उपआयुक्त पवार,भट, भातणकर असे कोणतेच उपआयुक्त नाहीत तसेच केंद्रे नाहीत. या वर्षभरात स्थायी समिती कशाप्रकारे चालणार याबाबत मला बोलायचे होते. परंतु निर्णय घेणारे अधिकारी कोणी नसतील तर बोलण्यांत कांही अर्थ नाही. तरी आजची सभा पूर्णवेळ तहकुब करण्यांत येत आहे.

(तद्नंतर मा.सभापती स्थायी समिती दुपारी ११.५५ वाजता सभा तहकूब केल्याचे जाहीर करतात.)

सभापती
स्थायी समिती
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

(मकरंद काळे)
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका,ठाणे

सभा तहकुबीची वेळ दु.१२.५५ वा.
दिनांक १२/३/२०१०
महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.